# प्रकरण दुसरे

## संदर्भ साहित्याचे समालोचन

# प्रकरण दुसरे

# संदर्भ साहित्याचे समालोचन


२.१ प्रास्ताविक

२.२ संबंधित साहित्याचा अभ्यास

२.३ संबंधित संशोधनाचे समालोचन

२.४ समारोप

संदर्भ

# प्रकरण दुसरे

# संदर्भ साहित्याचे समालोचन

## २.१ प्रास्ताविक

माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही व स्वरुप यांवरती संशोधन कशा- प्रकारे झाले आहे. झालेल्या संशोधनासाठी वेगवेगळ्या संशोधकांनी कोणकोणत्या प्रकारची माहिती मिळवली आहे. त्यासाठी कोणती संशोधन साधने वापरली याचा उपयोग प्रस्तुत संशोधनात तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी झालेला आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने ज्या वेगवेगळ्या संशोधन कार्याचा आढावा घेतला आहे त्याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे.

१) संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळवणे.

२) पूर्वी झालेल्या संशोधनातून प्रस्तुत संशोधन पूर्णतः वेगळे ठेवणे, त्यामध्ये साम्य येऊ न देणे.

३) प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणा-या संशोधन सामग्रीसाठी योग्य साधने निवडणे व निश्चीत करणे.

४) संशोधन कार्यासाठी सांख्यिकीय माहितीचे स्वरुप समजावून घेणे.

५) पूर्वी झालेल्या संशोधनाचा प्रस्तुत संशोधनात आधार सामग्री म्हणून उपयोग करणे उदा. अर्थनिर्वचन करताना मार्गदर्शन मिळवणे.

प्रस्तुत संशोधन नियोजन व कार्यवाही या वर्गातील आहे. संबंधीत विषयात यापूर्वी कोणी संशोधन केले आहे का ? केले असल्यास कोणत्या प्रकारचे आहे ? त्याची उद्दिष्टे कोणती ? या सर्व घटकांचा आढावा घेण्याचे संशोधकाने ठरविले.

त्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात संशोधन केलेल्या संशोधनाची माहिती विविध ग्रंथांतून घेतली माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही या विषयावर अद्याप संशोधन केलेले नाही. परंतु संशोधनाशी आनुषंगिक असे संशोधन पुढील काही प्रमुख संशोधनाचे समालोचन यामध्ये दिलेले आहे.

## २.२ संबंधित साहित्याचा अभ्यास :-

संबंधित साहित्याचे समालोचन करण्यासाठी अभ्यासकाने पुढील शैक्षणिक संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला.

१. **A survey of Research in Education.**
**M.B. Buch.**
centre of Advanced study in Education, Faculty of Education and Phychology, Maharaja Sayajirao University of Boroda, India 1974.

२. **Second Survey of Research in Education**
**M.B.Buch.**
Society for Educational Research and Devt. Baroda India 1979.

३. **Thirdy survey of Research in Education - 1978 - 1983**
**M.B.Buch.**
National Council of Educational Research and Training New Delhi,1986

४. **Fourth Survey of Research in Education 1983 - 1988**
**Valume - I**
**M.B. Buch**
National Council of Educational Research and Training New Delhi - 1991

५. **Fourth survey of Research in Education 1983- 1988**
**Valume - II**
**M.B. Buch**
National Council of Educational Research and Training New Delhi - 1991

६. **Research in Education**
**John w. Best**
Prentic Hall of India, Private Limited, New Delhi

७. **Second National Survey of Secondary Teacher Education in India**
**B.M.Pandey.**
National council of Educational Research and Training New Delhi , 1969.

८. **The Third Indian Year Book of Educational Research.**
National Council of Educational Research and Training, New Delhi , 1968

९. **Educational Research in University of Bombay**
**Dr (Mrs)PratiBha Dea ( Ed )**
Department of Education University of Bombay , 1981

१०. मूल्यशिक्षण आणि ' मराठी ' क्रमिक पुस्तके
मधुकर वेदांते ,
सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर ,१९९१

११. मूल्यशिक्षण
करंदीकर सु.वा.
फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७
पृष्ठ क्रमांक ६

## २.३ संबंधित संशोधनाचे समालोचन

संशोधकाने ज्या संबंधित संशोधनाचा अभ्यास केला. ती संबंधित संशोधने खालील प्रमाणे

### १. श्री. मधुकर वेदांते

" माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास ! एम्. फिल्. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर १९८७ " [१]

### संशोधनाची उद्दिष्टे

१. इयत्ता ९ वी व १० वी च्या माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून होणा-या मूल्यांचा शोध घेणे.
२. मूल्यसंवर्धन संदर्भात इयत्ता ९ वी व १० वी च्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा शोध घेणे.
३. पाठांमधून व्यक्त होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यासाठी मराठीचे अध्यापक कोणते प्रयत्न करतात याचा शोध घेणे.
४. पाठात नोंद झालेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्यांमधील कारणाचा शोध घेणे.
५. मूल्ये अधिक चांगल्याप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्यासाठी कोणते प्रयत्न करावयाचे, कोणते उपक्रम हाती घ्यावयाचे या संदर्भात उपाय योजना सुचविणे.

### संशोधन शाधने

प्रस्तुत संशोधन कार्य करत असतांना संशोधकाने प्रामुख्याने शिक्षकांसाठी प्रश्नावली तर तज्ज्ञांसाठी मुलाखत या संशोधन साधनांचा वापर केलेला आहे.

### संशोधन कार्यपध्दती

संशोधकाने संशोधन सामग्री गोळाकरण्यासाठी कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांमध्ये मराठी विषयाचे अध्यापन इयत्ता ९ वी व १० वी करणा-या शिक्षकांची निवड केली.मराठी विषय शिकविणारे एकूण १०५ शिक्षकें निवडले. तसेच काही शिक्षकांच्या मुलाखती घेऊन माहिती मिळविली.

निष्कर्ष :-

१) मूल्यशिक्षणा संदर्भातील अध्यापकांचे अज्ञान दूर करण्यासाठी चर्चा, परिसंवाद, व्याख्याने, कृतिसत्रे, संदर्भीय पुस्तकांचे वाचन यांचा पुरेपूर वापर करावा.
२) विद्यार्थ्यांना आकर्षित करणा-या मनोरंजनाच्या विविध साधनांचा मूल्यशिक्षण संदर्भात एक शैक्षणिक साधन म्हणून वापर करता येईल याचा विचार व्हावा.
३) विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनामध्ये वाढ घेण्याच्या दृष्टीने मुलांना संस्कारक्षम, उपयुक्त पुस्तकांनी युक्त असणारे सुसज्ज ग्रंथालय प्रत्येक शाळेने जाणीवपूर्वक वृध्दिंगत करावे.
४) अध्ययन अध्यापन पध्दतींमध्ये मूल्यधिष्ठित दृष्टिकोन, ठेवण्याच्या दृष्टिने प्रयत्न करावेत.
५) सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करतांना ते प्रयोजनबध्द, नियोजनबध्द असावे त्यामध्ये अध्यापक व मुलांचा कृतीशील सहभाग असावा.सास्कृतिक उपक्रमाच्या परिपूर्तीनंतर त्याचे मूल्यमापन करण्यात यावे.
६) मूल्यशिक्षण कृतीसत्रामध्ये सहभागी झालेल्या अध्यापकांचे मनोगत त्या त्या शाळेतील इतर अध्यापकासमोर ठेवावे.
७) मूल्यशिक्षणासाठी व मूल्यसंक्रमणासाठी शाळेमध्ये आग्रह धरण्यात यावा इंत्यादी.

## ( २ ) महेद्रां यु

" शैक्षणिक गळतीची मूल्यसंरचना पी. एच्. डी. मानसशास्त्र आग्रा विद्यापीठ, १९७२ " [२]

उद्दिष्टे : -

१) पास - नापास आणि गळती झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सैध्दांतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सौदर्यविषयक मूल्ये शोधून काढणे आणि परस्परांची तुलना करणे.

२) शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थांच्या वर्तनामध्ये लिंगभेदाचा परिणाम होतो का ? याचा अभ्यास करणे.

३) पास - नापास आणि सोडून गेलेल्या विद्यार्थांच्यामध्ये सैध्दांतिक, सामाजिक, आर्थिक आणि सौदर्यविषयक मूल्यामध्ये असणा-या फरकांचा अभ्यास करणे.

४) वरील तिन्ही गटांच्या बाबतीत राजकीय आणि धार्मिक मूल्यांच्या बाबतीत फरक आहे किंवा नाही हे पाहणे.

## संशोधन साधने :-

या संशोधकासाठी संशोधकाने **Allport - Vernam Landey Study Values** व **Tandon's Test of Intelligent** या चाचण्यांचा वापर माहिती गोळा करण्यासाठी केलेला आहे.

## संशोधन कार्यपध्दती :-

संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केलेला आहे.नमुना निवडीसाठी १०० मुले शाळा सोडून गेलेली, १५० मुले नापास झालेली तर २०० मुले पास झालेली निवडली आहेत. हे सर्व मुले माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातील आग्रा शहरातील आहेत. नमुना निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने करण्यात आली. मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करुन मध्यमान व सहसंबंध गुणांक यांच्यामधील फरकाची तुलना केली आहे.

## निष्कर्ष :-

१. तिन्ही गटांमध्ये थोडयाफार फरकाने सैध्दांतिक, राजकीय आणि आर्थिक सौंदर्य-विषयक मूल्ये यांमध्ये साम्य आहे.

२. सोडून गेलेले विद्यार्थी आणि नापास झालेले विद्यार्थी यांच्यामध्ये धार्मिक मूल्यांच्या बाबतीत कोणताही फरक नसतो पण सोडून गेलेले विद्यार्थी आणि उत्तीर्ण विद्यार्थी यांच्यामध्ये धार्मिक मूल्यांच्या बाबतीत फरक आहे. त्याच बरोबर पास आणि नापास विद्यार्थी यांच्यामध्ये धार्मिक मूल्यांच्या बाबतीत काही फरक नाही.

३. एकूणच संपूर्ण मूल्यसंरचनेचा विचार करता सोडून गेलेले विद्यार्थी आणि पास व नापास विद्यार्थी यांच्यामध्ये फरक आढळून येतो.

## ( ३ ) श्री. डी. डी. के.

" पश्चिम बंगालमधील काही माध्यमिक शाळांमधील मुलांच्या मूल्यशिक्षणाचा अभ्यास पी. एच्. डी. केरळ विद्यापीठ १९७४ " [३]

### उद्दिष्टे

१. माध्यमिक शाळांतील मुलांच्या मूल्यशिक्षणातील विकासाचा अभ्यास करणे.
२. माध्यमिक शाळांतील मुलांच्या मूल्यशिक्षणाचा त्यांच्या पालक आणि शिक्षक मूल्यांसंदर्भात अभ्यास करणे.

### संशोधन साधने :-

संशोधकाने संशोधन करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केलेला आहे. नमुना निवड करत असतांना हया दोन चाचण्यांचा वापर केला. त्या दोन चाचण्या मुलांसाठी एक व प्रौढ व्यक्तीसाठी एक अशा प्रकारच्या होत्या.

### संशोधन कार्यपध्दती :-

संशोधकाने ज्या दोन चाचण्या तयार केल्या त्यानंतर प्रमाणीत करण्यात आल्या. प्रमाणीत केलेल्या चाचण्या शहरी, ग्रामीण व औद्योगिक वसाहत असणा-या कल्याणी वसाहती मध्ये ८०३ विद्यार्थ्यांनी दिल्या. चाचणी दिलेले विद्यार्थी ५ वी, ७ वी व ९ वी वर्गातील होते. ८०३ विद्यार्थ्यांपैकी ४५२ विद्यार्थी औद्योगिक वसाहत, १९९ ग्रामीण वसाहत तर १५२ विद्यार्थी हे शहरी वसाहतीमधील होते.

### निष्कर्ष :-

१. ५वी व ७वी या वर्गातील मुलांच्या मूल्यांमध्ये कोणताही फरक नाही.
२. ५वी व ७वी वर्गातील विद्यार्थांच्या मूल्यांचे मध्यमान हे ९वी तील विद्यार्थांच्या मूल्यांच्या मध्यमानापेक्षा जास्त आहे. फक्त संवेदनशीलता वगळता.
३. ५वी व ७वी आणि ९वी तील विद्यार्थांच्या संवेदनशीलता मूल्याचा विचार करता काहीही फरक नाही.
४. शहरी, ग्रामीण, आणि औद्योगिक क्षेत्रातील मूल्यशिक्षण विकासामध्ये सारखेपणा नाही तरीपण वरील तीनही क्षेत्रातील ५वी,९वी तील मुलांच्यामध्ये मूल्यांच्या बाबतीत फरक आहे. पण अशा प्रकारचा फरक इयत्ता ७ वी तील मुलांच्यामध्ये असत नाही.

५. मुलांच्या मूल्यांमध्ये आणि त्यांच्या आई-वडीलाच्या मूल्यामध्ये परस्पर संबंध असत नाही.

६. विद्यार्थी आणि त्यांचे शिक्षक यांच्या मूल्यांमध्ये परस्पर संबंध असत नाही.

## ( ४ ) श्री. कपूर एम.

" प्राथमिक शाळांमधील मुलांचे नैतिक शिक्षण ; सामाजिक यर्थात दृष्य
पी. एच्. डी. समाजशास्त्र दिल्ली विद्यापीठ, १९८६ " ४

## उद्दिष्टे

१. नैतिक शिक्षणाचा मजकूर शोधणे.
२. मुलांच्या सामाजिक आंतरक्रियांचे संदर्भ तपासून पाहणे.
३. मुलांच्यामध्ये मूल्यसंक्रमण होण्याची प्रक्रिया तपासून पाहणे.
४. मुलांचे सहशिक्षण व बौध्दिक विकास यांमधील परस्पर सहसंबंध अभ्यासणे.

## संशोधन साधने

वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर संशोधकाने संशोधनासाठी केलेला आहे. संशोधनासाठी आवश्यक असणारी सामग्री मिळविण्यासाठी विद्यार्थांचे निरीक्षण, मुलाखती, प्रासंगिक नोंदी, शालेय दप्तर, शालेय अभ्यासक्रमातील पुस्तके इत्यादी साधने वापरली.

## संशोधन कार्यपध्दती

संशोधकाने दिल्ली शहरा जवळील खेडे गावाची निवड नमुना निवडीसाठी केली. संशोधकासाठी आवश्यक असणारी सामग्री गोळा करण्यासाठी लग्न - समारंभ, वाढदिवस, पुण्यतिथी इत्यादी समारंभातून माहिती मिळवली त्याच बरोबर शालेय नोंदी व शालेय अभ्यासक्रमातील पुस्तकांमधून माहिती मिळविली.

## निष्कर्ष :-

१. आज्ञाधारकपणा, वडीलधा-यांबद्दल आदर, हिंदु धर्मातील " कर्मा " शी निगडीत मूल्य आणि पापाच्या कल्पना, लिंगभेदानुसार कामाची विभागणी, निष्ठा या रुढ संकल्पना आहेत.

२. वरील मूल्याचे संक्रमन सामाजिक व घरगुती आंतरक्रियामधून होते.

३. आज्ञाधारकपणा, वडीलधा-यांबद्दल आदर ही मूल्ये प्रौढांच्या नियंत्रण आणि शिस्त या प्रकियांमधून संक्रमित होतात.

४. वेगवेगळ्या धार्मिक विधी आणि सण त्याच बरोबर लोककथा यांमधून आज्ञाधारकपणा, आणि वडीलधा-यांना मान या मूल्यांची माहिती मिळते.

५. उच्चवर्गीय मुलांना कनिष्ठवर्गीय मुलांशी परस्परसंबंध प्रस्थापित करण्यात परावृत्त व मनाई केली जाते.

६. राष्ट्रीयत्व, निधर्मवाद, लोकशाही ही मूल्ये प्राथमिक स्वरुपाच्या सामाजिक मूल्यांना नाकारत नाहीत आणि वरील दोन्ही मूल्यांचे मुलांच्या कौटुबिंक व शालेय जीवनात महत्वाचे स्थान आहे.

## ( ५ ) श्री. डी. लिमा, सी. जी. व श्री. पुरी एम्.

" विद्यार्थ्यांच्या मूल्यसंरचनेवरती सर्जनशील मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या परिणामांचा प्रायोगिक अभ्यास एस्. आय्. ई. पूणे १९८५ " [५]

### उद्दिष्टे :-

१. मूल्याधिष्ठित शिक्षणामध्ये बुध्दिमथंन तंत्रांची परिणामकारकता शोधून काढणे.

२. मूल्याधिष्ठित शिक्षणांच्या अध्यापनामध्ये बुध्दिमथंन आणि पारंपारिक पध्दतीच्या परिणामकारकतेचा संबंध शोधून काढणे.

## संशोधन साधने

प्रायोगिक पध्दतीचा वापर प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने केला आहे. त्यामध्ये त्यांनी पूर्व पूर्वोत्तर चाचणी, अभिवृत्ती चाचणी व **Raven's Standard Progressive Matrices** आणि **Torrance Test of Creative Thinking** वापर केला.

## संशोधन कार्यपध्दती :-

संशोधकांनी मुंबई शहरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता ९ वी च्या वर्गात शिकत असलेल्या १६६ मुलांना पूर्व व पूर्वोतर चाचणी दिली. त्याचप्रमाणे अभिवृती चाचणी व Raven's Standard Progre matrices आणि Torrance Test of Creative Thilking चा वापर केला. T गुणांचा वापर करुन माहितीचे अर्थवचन करण्यात आले.

## निष्कर्ष :-

१. प्रामाणिकपणा या मूल्यांच्या बाबतीत पूर्वचाचणी आणि पूर्वोत्तर चाचणीतील मध्यमानात फरक दिसून आला.
२. निस्वार्थीपणा या मूल्याकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांच्या वृष्टीकोनात प्रायोगिक अभ्यासानंतर फरक दिसून आला.
३. प्रसिध्दीसाठी काहीही करणे हा विद्यार्थ्यांचा वृष्टीकोन असतो याची खात्री करण्यात आली.
४. हेकेखोरपणा,संप्पती,सत्ता या मूल्यांच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या असणा-या वृष्टीकोनात कोणताही बदल दिसून आला नाही.

## ( ६ ) श्री. वसंत ए

" दिल्लीतील उच्चमाध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या त्यांची बुध्दिमत्ता संपादनुक आणि सामाजिक, आर्थिक दर्जा यासंबंधी कार्यात्मिक मूल्यांचा अभ्यास "पी.एच्. डी ( शिंक्षणशास्त्र ) दिल्ली विद्यापीठ १९७२ "[६]

## उद्दिष्टे :-

१. कार्यात्मक मूल्यशोधिका तयार करणे.
२. भारतातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्यामध्ये मूल्य अवस्था आहे की नाही ते पाहणे.
३. व्यावसायिक मूल्य आणि व्यावसायाला दिलेले प्राधान्य यांमध्ये संघर्ष अथवा समेट आहे किंवा नाही ते पाहणे.
४. कार्यात्मक मूल्यांवरती आर्थिक, सामाजिक, दर्जाच्या परिणामांचा अभ्यास करणे.
५. मुलांच्या कार्यात्मक मूल्यामध्ये आणि मुर्लीच्या कार्यात्मक मूल्यांमध्ये फरक आहे किंवा नाही ते शोधून काढणे.

६. कार्यात्मक मूल्यविकासामध्ये 'जात' हा घटक परिणाम करतो किंवा नाही हे तपासून पाहणे.

## संशोधन साधने :-

संशोधकाने संशोधन सामग्री गोळा करण्यासाठी १. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीगत नोंदी पत्रक २. **Raven's Progresive matrices Test** ३. अभिवृत्ती चाचणी ४. सामाजिक अर्थिक मापन चाचणी. ५. कार्यात्मक मूल्य शोधिकाचा वापर प्रस्तुत संशोधनात केला.

## संशोधन कार्यपध्दती :-

संशोधकाने तामिळी संस्कृती असलेला एक गट निवडला. त्यागटामध्ये इयत्ता ९ वी व १० वी वर्गात शिकत असलेले एकूण ९३४ मूले व मुली होत्या गटातील सर्व विद्यार्थी ब्राम्हण कुटुंबातील मद्रासी शिक्षण संस्थेतील चार शाळांमधील होते. हे सर्व विद्यार्थी दिल्ली शहरातील होते. वरील चाचण्या देऊन मध्यमान, मध्यमान विचलन, सहसंबंध गुणांक व Chi-Square चे मूल्य काढून निष्कर्ष काढले.

## निष्कर्ष :-

१. सर्जनशीलता, आर्थिक मिळकत, परस्पर संबंध , व्यक्तीगत ध्येय, प्रतिष्ठा ही मूल्ये अधिक अढळून आली.
२. साहस, सत्ता पर्यावरण, विविधता, समाजहित हया मूल्यांना कमी प्रमाणात प्राधान्य दिसून आले.
३. व्यावसायिक मूल्ये आणि व्यवसाय प्राधान्य यामध्ये अनुरुपता दिसून आली.
४. पंधरा पैकी सात कार्यात्मक मूल्यांच्या बाबतीत लिंगभेदाचा परिणाम दिसून आला तो पुढीलप्रमाणे कला , साहस, परस्पर संबंध, अर्थिक मिळकत, पर्यावरण, सर्जनशीलता, व्यक्तिगत ध्येय आणि प्रतिष्ठा
५. परस्पर संबंध, आर्थिक विकास, विविधता आणि व्यावसायातील स्वातंत्र्य यांमध्ये दर्जात्मक फरक दिसून आला.
६. साहस, परस्पर संबंध, व्यावसायातील स्वातंत्र्य, सर्जनशीलता, व्यक्तीगत ध्येय, कुटुंब यांच्याशी बुध्दिमत्तेचा घनिष्ठ संबंध आहे.

## २.४ समारोप :-

संबंधित संशोधनाचा घेतलेला आढावा हा संशोधकाला प्रस्तुत संशोधन करतांना मार्गदर्शक ठरला. संपूर्ण आढाव्याचा विचार करतांना मूल्यशिक्षणाच्या संदर्भात जे वेगवेगळे संशोधन झालेले आहे. त्यांमध्ये मूल्यशिक्षणाच्या कार्यवाही वरती संशोधन झालेले नाही.

" माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाच्या कार्यवाहीचा चिकीत्सक अभ्यास " हे संशोधन मूलगामी आणि नाविन्यपूर्ण आहे.

पुढील प्रकरण ३ मध्ये माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही, महत्व व स्वरुप यांचे विवेचन केलेले आहे.

# संदर्भ


१. श्री. वेदांते मधुकर - एम्. फिल्. शोध प्रबंध,
१९८७
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. **MAHENDRA U** -- Cited by M. B. Buch
A Survey of Research in
Education Centre of Advanced
Study of Education, Faculty of
Education & Psychology,
Maharaja Sayajirao University
Baroda 1974 page -109

३. **Ibid 2**

४. **Kapur M.** -- Cited by M.B. Buch
Fourth Survey of Research in
Education
Volume - I
N. C. E. R. T. New Delhi 1991
page - 161

५. **D' Lima C.G.& PURI M** -- Cited by M. B. Buch
Fourth Survey of Rcsearch in
Education
Volume - 2
N.C.E.R.T. New Delhi 1991

६. **Ibid 2**